दै. देशोन्नती दि. 05.10.25

# बारमधील चोरी प्रकरणातील चोरटे अटकेत



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** वाजेगाव बायपास मार्गावर असलेल्या संदीप बार येथील चोरी प्रकरणातील दोन आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून १० हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाजेगाव बायपास मार्गावरील संदीप बारच्या शटरचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन चोरट्यांनी १२ हजार रुपये किमतीचा दारुचा एक बॉक्स व रोख रक्कम ७ हजार रुपये असे कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले. याप्रकरणी पांडुरंग पुयड यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे. दरम्यान पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड व सोबत पथकातील अंमलदार ४ ऑक्टोबर रोजी पेट्रोलींग करीत असताना त्यांना नमूद गुन्ह्यातील दोन आरोपी शेख इमरोज शेख अब्दुल रज्जाक व इरफान खान नसरत खान हे चोरीचा माल विकण्याच्या उद्देशाने वाजेगाव बायपास मार्गावर थांबल्याची माहीती मिळाली . या माहितीवरून सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता त्यांनी व त्याचे इतर दोन सहकारी शेख इलीयास शेख खदीर रा. वाजेगाव व सोहेल उर्फ छोटा गुज्जर असे चौघांनी मिळून संदीप बार फोडुन चोरी केल्याचे सांगीतले. नमुद दोन आरोपीकडून मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाई पथकात पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, पोहेकॉ वसंत केंद्रे, विष्णू कल्याणकर, संतोष पवार, मारोती पचलिंग, गंगलवाड यांचा समावेश होता.